# प्रश्नसंच – सत्र ६ पेपर ९

'एका पुरस्कारप्राप्त लेखकाची मुलाखत' हे कोणत्या प्रकारातील मुलाखतीचे उदाहरण आहे?

अ. जन मुलाखत
ब. विषयकेंद्री मुलाखत
क. व्यक्तिकेंद्री मुलाखत
ड. गट मुलाखत

मुलाखत प्रामुख्याने कोणाची घेतली जाते?

अ. सामान्य माणसांची
ब. असामान्य व कर्तृत्ववान माणसांची
क. कोणाही व्यक्तीची
ड. मुलाखतदात्याची

कादंबरीचे परीक्षण करताना कोणत्या घटकांचे विश्लेषण करणे आवश्यक असते?

अ. कथानक, व्यक्तिरेखा, भाषाशैली
ब. कथानकातील आशयसूत्रे
क. कथानकातील तंत्रे, काळ व अवकाश
ड. कथानक, पात्र, भाषा, निवेदन तंत्र, वातावरण, आशयसूत्रे इ. सर्व

'बुकरिव्ह्यू' या शब्दासाठी मराठीत कोणता प्रतिशब्द वापरला जातो?

अ. ग्रंथपरीक्षण
ब. पुस्तकचर्चा
क. पुस्तक मूल्यमापन
ड. पुस्तक आढावा

आकाशवाणीवरील मुलाखत वर्तमानपत्रातील मुलाखतीपेक्षा कोणत्या बाबतीत वेगळी ठरते?

अ. मुलाखतीची पूर्वतयारी करावी लागते
ब. मुलाखतीचे लेखन करावे लागते
क. प्रकट मुलाखत घ्यावी लागते
ड. मुलाखत ध्वनिप्रक्षेपित असते

सह्याद्री मराठी वाहिनीवरील 'हॅलो डॉक्टर' हा कार्यक्रम कोणत्या प्रकारच्या मुलाखतीचे उदाहरण आहे?

अ. जन मुलाखत
ब. विषयकेंद्री मुलाखत
क. व्यक्तिकेंद्री मुलाखत
ड. असंरचित मुलाखत

'मुलाखत' हा शब्द खालीलपैकी कोणत्या शब्दावरून आला आहे?

अ. विचारपूस
ब. गाठभेट
क. मुलाकात
ड. बोलाचाली

व्यक्तिकेंद्री मुलाखत म्हणजे काय?

अ. व्यक्तीचे व्यक्तिमत्त्व व कार्य याविषयी जाणून घेणे
ब. व्यक्तीच्या कुटुंबाविषयी जाणून घेणे
क. विविध व्यक्तींची मते जाणून घेणे
ड. विशिष्ट विषयाबद्दल जाणून घेणे

मुलाखतकाराने कोणत्या गोष्टींचा अभ्यास करणे आवश्यक असते?

अ. प्रश्नावली
ब. मुलाखत लेखन
क. प्रेक्षक-वाचक-श्रोतावर्ग
ड. मुलाखतदाता, मुलाखतीचे प्रयोजन, प्रसारमाध्यम

दूरदर्शनवरील मुलाखतीचे वेगळेपण काय आहे?

अ. मुलाखत दृकश्राव्य असते
ब. मुलाखतीत प्रेक्षकांचा प्रत्यक्ष सहभाग असतो
क. मुलाखतदाता व मुलाखतकार यांचाच सहभाग असतो
ड. आकाशवाणीवरही प्रसारित होऊ शकते

ग्रंथपरीक्षणानंतर अन्य कोणती माहिती देणे आवश्यक असते?

अ. लेखकाचे नाव, प्रकाशन वर्ष व संस्था, पृष्ठसंख्या व मूल्य
ब. लेखकाचे नाव व पुस्तक मूल्य
क. पुस्तक मूल्य व पृष्ठसंख्या
ड. प्रकाशन संस्था व पुस्तक मूल्य

ग्रंथपरीक्षण म्हणजे काय?

अ. पुस्तकातील आशय सांगणे
ब. प्रकाशन संस्था व वर्ष याची माहिती देणे
क. पुस्तकाचे मूल्य जाहिर करणे
ड. पुस्तकातील सर्व घटकांचे विश्लेषण करून त्यांच्या गुणदोषांची चर्चा करणे

प्रकट मुलाखतीची सुरुवात कशी करावी?

अ. प्रश्न विचारून
ब. मुलाखतदात्याचे स्वागत व परिचय देऊन
क. प्रेक्षकांच्या स्वागत व परिचयाने
ड. मुलाखतदात्यालाच स्वतःचा परिचय द्यायला सांगून

ग्रंथातील अनेक बारकावे गुणदोषांसह सूक्ष्मपणे नमूद करणे हे कोणत्या प्रकारचे ग्रंथपरीक्षण होय?

अ. स्थूल ग्रंथपरीक्षण
ब. सूक्ष्म ग्रंथपरीक्षण
क. वृत्तपत्रीय ग्रंथपरीक्षण
ड. परिचयात्मक ग्रंथपरीक्षण

आय बी एन लोकमत वरील 'ग्रेट भेट' हा कार्यक्रम कोणत्या प्रकारच्या मुलाखतीचे उदाहरण आहे?

अ. व्यक्तिकेंद्री मुलाखत
ब. विषयकेंद्री मुलाखत
क. जन मुलाखत
ड. संरचित मुलाखत

मुलाखतीत प्रश्न विचारण्याचा क्रम कसा असावा?

अ. सर्वसाधारण प्रश्नांकडून विशिष्ट प्रश्नांकडे
ब. प्रश्न कोणत्याही क्रमाने विचारावेत
क. विशिष्ट प्रश्नांकडून सर्वसाधारण प्रश्नांकडे
ड. जसे प्रश्न सुचतात तसे विचारावेत

जन मुलाखत म्हणजे काय

अ. प्रेक्षकांनी मुलाखतदात्याला प्रश्न विचारून माहिती मिळविणे
ब. चालू घडामोडींबद्दल नागरिकांची मते जाणून घेणे
क. एका व्यक्तीने विविध गटांची एकाचवेळी मुलाखत घेणे
ड. विशिष्ट विषयावर विविध व्यक्तींची मतमतांतरे जाणून घेणे

चांगल्या ग्रंथपरीक्षणाचा गुण कोणता?

अ. लेखनाची स्तुती करणे
ब. लेखनावर टिका करणे
क. तटस्थ, वस्तुनिष्ठ व अभ्यासपूर्ण परीक्षण लिहिणे
ड. दीर्घ लांबीचे परीक्षण लिहिणे

ग्रंथपरीक्षणाचा मुख्य उद्देश कोणता?

अ. वाचकांना नवीन पुस्तकाची माहिती देणे
ब. नवीन पुस्तकाची जाहिरात करणे
क. पुस्तकाच्या लेखकाची प्रसिद्धी करणे
ड. परीक्षण लिहून प्रसिद्धी मिळविणे

'शेतकऱ्यांच्या आत्महत्या' या विषयावर राजकीय नेते व शेतकरी संघटनेचे नेते यांच्यासोबत केलेला संवाद कोणत्या प्रकारच्या मुलाखतीचे उदाहरण आहे?

अ. गट मुलाखत
ब. जन मुलाखत
क. विषयकेंद्री मुलाखत
ड. व्यक्तिकेंद्री मुलाखत

एखाद्या साहित्यकृतीचे परीक्षण करताना लेखकाचे समग्र साहित्य वाचले तर कोणता महत्त्वाचा फायदा होतो?

अ. लेखकाच्या लेखनाची जातकुळी समजते
ब. लेखकाच्या समग्र साहित्यात त्या पुस्तकाचे नेमके स्थान स्पष्ट होण्यास मदत होते
क. लेखकाने किती पुस्तके लिहिली याची माहिती मिळते
ड. परीक्षणकर्त्याचे वाचन व अभ्यास यात भर पडते

कोणते प्रश्न विचारल्यावर मुलाखतीत चर्चेला अधिक वाव मिळतो?

अ. खुले प्रश्न
ब. मोठे प्रश्न
क. बंदिस्त प्रश्न
ड. लहान प्रश्न

'माझे विद्यापीठ' हे शीर्षक आणि या पुस्तकाच्या मुखपृष्ठावरील फूटपाथवर झोपलेल्या माणसाचे चित्र यात खालीलपैकी अर्थाचा कोणता अनुबंध स्पष्ट होतो?

अ. अभावग्रस्त जीवनातील खडतर अनुभवातून झालेले शिक्षण
ब. गरिबी व शोषण
क. फूटपाथ हेच विद्यापीठ आहे
ड. मजुरांना फूटपाथवरच राहावे लागते

मुलाखतीत प्रश्न विचारताना मुलाखतकाराने कोणती गोष्ट टाळली पाहिजे?

अ. मुलाखतदात्याशी मोकळा संवाद करणे
ब. मुलाखतदात्याला अधिक बोलते करणे
क. चर्चेला अधिक वाव मिळावा म्हणून खुले प्रश्न विचारणे
ड. मुलाखतदात्याला बोलू न देता स्वतःच अधिक बोलणे

मुलाखतकाराकडे खालीलपैकी कोणता गुण असणे आवश्यक असते?

अ. चांगला मित्र
ब. चांगला सहकारी
क. चांगला माणूस
ड. चांगला श्रोता व प्रश्नकर्ता

'एकूण मराठी कवितेचा विचार करता नव्वदोत्तरी कवितेचे काय वेगळेपण तुम्हाला जाणवते?' हा कोणत्या प्रकारचा प्रश्न आहे?

अ. लहान प्रश्न
ब. खुला प्रश्न
क. मोठा प्रश्न
ड. बंदिस्त प्रश्न

कवितासंग्रहाचे परीक्षण करताना कोणत्या घटकांचे विश्लेषण करणे आवश्यक असते?

अ. कवितेतील आशय
ब. कवितेची भाषाशैली
क. कवीची प्रतिभा
ड. कवितेतील आशयसूत्रे, भाषासौंदर्य, अनेकार्थता, सूचकता, रचनाप्रकार, लेखन प्रवृत्ती इ, सर्व

'बेबी' या नाटकाचे परीक्षण करताना खालीलपैकी कोणते आशयसूत्र ठळकपणे जाणवते?

अ. माणसातील हिंसा व वासना
ब. जीवनमूल्यांचा पुरस्कार
क. सुष्ट-दुष्ट प्रवृत्तीमधील संघर्ष
ड. मानवी नातेसंबंध

नोकरीसाठीच्या मुलाखतीतून उमेदवारासंदर्भात काय जाणून घेण्याचा प्रयत्न असतो?

अ. उमेदवाराची कौटुंबिक पार्श्वभूमी
ब. उमेदवाराची आर्थिक पार्श्वभूमी
क. शैक्षणिक व व्यावसायिक गुणवत्ता
ड. भाषाज्ञान

जन मुलाखत प्रामुख्याने कोणत्या प्रसारमाध्यमासाठी घेतली जाते?

अ. दूरदर्शन
ब. आकाशवाणी
क. वर्तमानपत्र
ड. समाजमाध्यमे

मुलाखतीचे लेखन कोणत्या भाषेशी जवळीक ठेवणारे असले पाहिजे?

अ. अलंकारिक
ब. पुस्तकी
क. बौलभाषा
ड. ग्रामीण

मुलाखतीचे कोणते दोन प्रकार पडतात?

अ. द्विकेंद्री व त्रिकेंद्री कथन
ब. व्यक्तिकेंद्री व विषयकेंद्री मुलाखत
क. प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मुलाखत
ड. प्रकट व अप्रकट मुलाखत

मुलाखतकार, मुलाखतदाता व प्रेक्षकांचा प्रत्यक्ष सहभाग असणाऱ्या मुलाखतीला काय म्हणतात?

अ. त्रिकेंद्री कथन
ब. व्यक्तिकेंद्री मुलाखत
क. विषयकेंद्री मुलाखत
ड. जन मुलाखत

वृत्तपत्र किंवा नियतकालिकांतून प्रसिद्ध होणाऱ्या समकालीन साहित्यकृतीविषयीच्या लेखनाला काय म्हणतात?

अ. समीक्षा
ब. लेख
क. ग्रंथपरीक्षण
ड. निबंध

दूरदर्शनवरील मुलाखतीचे स्वरूप कसे असते?

अ. थेट प्रक्षेपण किंवा क्वचित संकलित
ब. ध्वनिमुद्रित
क. छापील
ड. ऑनलाईन

समाजातील चालू घडामोडींवर मते मांडण्याची संधी नागरिकांना कोणत्या मुलाखतीत मिळते?

अ. प्रकट मुलाखत
ब. व्यक्तिकेंद्री मुलाखत
क. गट मुलाखत
ड. जन मुलाखत

'झेलझपाट' या कादंबरीच्या भाषाशैलीचे विशेष कोणते आहेत?

अ. अलंकारिक, काव्यात्म भाषा

ब. संमिश्र भाषा

क. कोरकू बोली भाषेचा गोडवा, या बोलीतील संवाद, लोकगीते, प्रतिमा, म्हणी, वाक्प्रचार इ

ड. साधी, सरळ, सहज भाषा

छापील माध्यमातील मुलाखतीला कोणती मर्यादा असते?

अ. शब्दसंख्येची मर्यादा
ब. वेळेची मर्यादा
क. बौलण्याची मर्यादा
ड. व्यक्ती संख्येची मर्यादा

मुलाखतीत मुलाखतदात्याची भूमिका काय असावी?

अ. उत्तरांतून आवश्यक ती सर्व माहिती प्रेक्षकांपर्यंत पोचविणे
ब. कमीतकमी बोलणे
क. मुलाखतकाराला प्रश्न विचारणे
ड. प्रेक्षकांच्या प्रश्नांना महत्त्व न देणे

एका साहित्यकृतीचे केलेले स्वरूप विश्लेषण व गुणदोषवर्णन म्हणजे काय?

अ. समीक्षा
ब. निबंध
क. ग्रंथपरीक्षण
ड. लेख

केंद्रीय अर्थसंकल्प जाहिर झाल्यानंतर विविध स्तरांतील जनतेच्या प्रतिक्रिया समजून घेण्यासाठी घेतलेल्या मुलाखतीस काय म्हणतात?

अ. विषयकेंद्री मुलाखत
ब. जन मुलाखत
क. गट मुलाखत
ड. खुली मुलाखत

'तुम्ही नवीन कादंबरी लिहित आहात का?' हा कोणत्या प्रकारातील प्रश्न आहे?

अ. मोठा प्रश्न
ब. लहान प्रश्न
क. खुला प्रश्न
ड. बंदिस्त प्रश्न

'बुक रिव्ह्यू' या इंग्रजी शब्दाला मराठीत कोणता प्रतिशब्द रूढ आहे?

अ. ग्रंथसमीक्षा
ब. ग्रंथपरीक्षण
क. ग्रंथओळख
ड. ग्रंथविश्लेषण

मुलाखत म्हणजे काय?

अ. संभाषण
ब. बोलाचाली
क. वादविवाद
ड. दोन व्यक्तींमधील विशिष्ट विषयावर झालेला संवाद

वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या ग्रंथपरीक्षणास काय म्हणतात?

अ. स्थूल ग्रंथपरीक्षण
ब. परिचयात्मक ग्रंथपरीक्षण
क. वृत्तपत्रीय ग्रंथपरीक्षण
ड. सूक्ष्म ग्रंथपरीक्षण

ग्रंथपरीक्षणाची पहिली पायरी कोणती?

अ. ग्रंथवाचन
ब. ग्रंथपरीक्षणाचे प्रत्यक्ष लेखन
क. महत्त्वपूर्ण मजकूराच्या नोंदी करणे
ड. चिंतन-मनन

मुलाखतदात्याचा परिचय व आभारप्रदर्शनाचा औपचारिक भाग कोणत्या प्रसारमाध्यमातील मुलाखतीत येतो?

अ. वर्तमानपत्र
ब. आकाशवाणी
क. दूरदर्शन
ड. आकाशवाणी व दूरदर्शन

वर्तमानपत्रासाठी मुलाखतीचे लेखन केल्यावर शीर्षक कसे द्यावे?

अ. अमुक अमुक यांची मुलाखत
ब. मुलाखतदात्याच्या तोंडचे एखादे लक्षवेधक विधान शीर्षक म्हणून वापरावे
क. अमुक अमुक विषयावरील मुलाखत
ड. मुलाखतकाराच्या तोंडचे एखादे महत्त्वपूर्ण वाक्य शीर्षक म्हणून वापरावे

राज्यातील पाणी टंचाईसंबंधी मुख्यमंत्र्यांची घेतलेली मुलाखत कोणत्या प्रकारात समाविष्ट होते?

अ. विषयकेंद्री मुलाखत
ब. व्यक्तिकेंद्री मुलाखत
क. संरचित मुलाखत
ड. असंरचित मुलाखत

मुलाखतीचे फलित कशात असते?

अ. मुलाखत चांगली रंगणे
ब. आवश्यक सर्व माहिती श्रोत्यांपर्यंत पोचणे
क. मुलाखतीचे लेखन करणे
ड. मुलाखतीला प्रसिद्धी मिळणे

रेडियो, टि.व्ही. यापेक्षा वर्तमानपत्रासाठी केलेले मुलाखतलेखन यात कोणता फरक आहे?

अ. भूतकाळात घेतलेल्या प्रकट मुलाखतीचा वृत्तांत वर्तमानपत्रात प्रसिद्ध होतो
ब. मुलाखत लिहून नंतर ती प्रत्यक्षात घेतली जाते
क. वर्तमानकाळात घेतलेल्या प्रकट मुलाखतीचा वृत्तांत वर्तमानपत्रात प्रसिद्ध होतो
ड. मुलाखत लेखनासाठी मुलाखतदात्याकडून आधीच उत्तरे मागविली जातात

स्थूल ग्रंथपरीक्षण म्हणजे काय?

अ. ग्रंथाचे बारकाईने विश्लेषण करणे
ब. ग्रंथाचा केवळ परिचय करून देणे
क. ग्रंथाला विविध निकष लावून विश्लेषण करणे
ड. ग्रंथाविषयी अभिप्राय देणे

नाटकाचे परीक्षण करताना त्यातील कोणकोणत्या घटकांचे विश्लेषण करावे लागेल?

अ. नाटकाचे कथानक व रंगसूचना
ब. नाटकाची रचना, कथानक, पात्र, भाषा व संवाद, रंगसूचना, नाट्य इ.
क. कथानक, पात्र, भाषा व संवाद
ड. नाटकाचा प्रयोग

व्यक्तिकेंद्री मुलाखतीचा हेतू काय असतो?

अ. व्यक्तीशी संवाद साधणे
ब. व्यक्तीशी ओळख वाढविणे
क. व्यक्तीच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकणे
ड. व्यक्तीस बोलते करणे

ग्रंथपरीक्षण लिहिल्यामुळे कोणत्या घटकांना त्याचा फायदा होतो?

अ. वाचक
ब. पुस्तक विक्रेता
क. प्रकाशक
ड. वाचक, पुस्तक विक्रेता, प्रकाशक, लेखक

डॉ. भालचंद्र नेमाडे यांचे कादंबरी लेखन आणि एकूण मराठी कादंबरी लेखनाची परंपरा या विषयावर चर्चा करण्यासाठी घेतलेली मुलाखत कोणत्या प्रकारात समाविष्ट करावी लागेल?

अ. व्यक्तिकेंद्री मुलाखत
ब. वाङ् मयीन मुलाखत
क. विषयकेंद्री मुलाखत
ड. व्यक्तिवादी मुलाखत

रसिक वाचकांना नव्या पुस्तकांपर्यंत पोचविण्याचे काम कोणत्या लेखन प्रकारातून साध्य होते?

अ. ग्रंथपरीक्षण
ब. जाहिरात
क. बातमी
ड. लेख

मुलाखतीत कोणते घटक असतात?

अ. मुलाखत घेणारा, मुलाखत देणारा, मुलाखत वाचणारा-ऐकणारा-पाहणारा
ब. मुलाखत देणारा व मुलाखत घेणारा
क. मुलाखत देणारा, मुलाखत घेणारा, अन्य तंत्रज्ञ
ड. मुलाखत देणारा, मुलाखत घेणारा, मुलाखत लिहिणारा

---